जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची पोलीस खात्याकडे प्रलंबित असलेली अफरातफरीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-१०९०/सीआर-२८४/२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- १ ऑक्टोबर, १९९०.

वाचा :- ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक- संकीर्ण-१०८९/सीआर-५५९४/२९, दिनांक:- १६ मे, १९८९

परिपत्रक

जिल्हा परिषद व्यवहारातील अफरातफरीचे/अपव्यवहाराची जी प्रकरणे पोलीस खात्याकडे चौकशीसाठी ६ महिन्यापेक्षा जास्त काळ प्रलंबित असतील तर त्याचा आढावा घेऊन संबंधित प्रकरणे पोलीस आयुक्त/अधीक्षक यांच्या निदर्शनास आणावीत व अशा प्रकरणांचा दर ३ महिन्यांची आढावा घेण्यात यावा अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त यांना वरील दिनांक- १६ मे, १९८९ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. याबाबत अशाही सूचना देण्यात येत आहेत की, विभागीय आयुक्तांनी दर ३ महिन्यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या जिल्हा परिषदांमधील प्रकरणांचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल गृह विभाग, व ग्राम विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे पाठवावा व त्याबाबत पाठपुरावा करावा. त्यामुळे पोलीस खात्यात चौकशीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याबाबत होणारा विलंब टाळता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ दै. चिं. घेवारे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

कार्यालय, २१ ९० १० OCT 1990

१५८२

प्रति,
१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, [लेखा परीक्षा], मुंबई,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२, [लेखा परीक्षा], नागपूर,
५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, नवी मुंबई,
६. उप मुख्य लेखा परिक्षक [वरिष्ठ] स्थानिक निधी लेखा, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
७. सर्व जिल्हाधिकारी/सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
८. सर्व मंत्रालयीन विभाग [विधी व न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा-विधान कार्य विभाग सोडून]